| | | | |
|---|---|---|---|
| MHRG160002542024 | खटला दाखल तारीख | : | १८.१२.२०२४ |
| | खटला नोंदणी तारीख | : | १८.१२.२०२४ |
| | खटला निकाल तारीख | : | १०.०३.२०२६ |
| | कालावधी | : | **वर्ष महिने दिवस** |
| | | | **०१ ०२ २३** |

## मे. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, पाली–सुधागड यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी श्री.रा.अ.शिवरात्री )

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१२२/२०२४.**

**निशाणी क्र. २१/ब.**

(पहिली खबर क्र.१४५/२०२४,
पाली पोलीस ठाणे)

भाग अ
(para 44(i) of Chapter VI of Criminal Manual)

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | :: | **महाराष्ट्र शासनतर्फे पाली पोलीस ठाणे** |
| **प्रतिनिधीत्व** | :: | **सरकारतर्फे विधीज्ञ श्री.व्ही. एस. म्हात्रे,** |
| **आरोपी** | :: | **राम किसन साळुंखे,**<br>वय–४२ वर्षे, व्यवसाय– दुकानदार,<br>रा. व–हाड बौध्दवाडा, ता.सुधागड, जि.रायगड |
| **प्रतिनिधीत्व** | :: | **आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती अक्षरा देशमुख,** |

भाग ब
(para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | ३१.१०.२०२४ |
| प्रथम माहिती अहवाल नोंद दिनांक | ३१.१०.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १८.१२.२०२४ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०७.०१.२०२५ |
| पहिला साक्षीदार तपासल्याचा दिनांक | ०७.०४.२०२५ |
| शेवटचा साक्षीदार तपासल्याचा दिनांक | ३०.०९.२०२५ |
| निकाल राखून ठेवल्याची दिनांक | --- |
| निकालाचा दिनांक | १०.०३.२०२६ |
| शिक्षा झाल्याचा दिनांक | --- |

## आरोपीचा तपशील

| आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटण्याची तारीख | गुन्हे दाखल | निर्दोष असो वा दोषी | चौकशी दरम्यान तुरुंगात गेल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| **राम किसान साळुंखे,** | बी.एन.एस.एस .३५(३) प्रमाणे नोटीस | - | महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५- ई अन्वये | निर्दोष | - |

भाग क

(para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual)

## अभियोग पक्ष/बचावपक्ष/न्यायालयाचे साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्ष –

| अनु.क्र. | नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी,पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, पंच व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| ०१. | मधुकर भगवान मानकर | ०७ लगत | पंच |
| ०२. | सिचन परशुराम भोईर | ०७ लगत | फिर्यादी |
| ०३. | नामदेव ज्ञानू अलदर | ०७ लगत | साक्षीदार |
| ०४. | प्ररेणा अनंत कडवे | ०७ लगत | तपासीक अंमलदार |
| ०५. | सचिन माधवराव निकम | ०७ लगत | साक्षीदार |

### ब.बचावाचे साक्षीदार, जर असतील तर –

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी,पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, पंच व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| | – | |

### क.न्यायालयाचे साक्षीदार, जर असतील तर –

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी,पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकिय |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | अधिकारी, पंच व इतर साक्षीदार ) |
| - | | |

**अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयाचे साक्षीदारांनी सिध्द केलेल्या कागदपत्रांची यादी.**

**अ.अभियोग पक्षाचे निशाणी क्रमांक –**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | ०९,पंच सा.क्र.०२ | पंचनामा |
| ०२. | ११,फिर्यादी.सा.क्र.०२ | फिर्याद |
| ०३. | १४,अ.सा.क्र.०४ | घटनास्थळाचे फोटोचे प्रमाणपत्र |
| ०४. | १५,अ.सा.क्र.०४ | रासायनिक परिक्षणाकामी पाठविलेला अहवाल |
| ०५. | १६,अ.सा.क्र.०४ | राष्ट्रीय प्रयोग शाळेकडून प्राप्त झालेले पत्र |
| ०६. | १८,अ.सा.क्र.०५ | मुद्देमाल पावती |
| ०७. | १९,अ.सा.क्र.०५ | आरोपीस पाठविलेली नोटीस |

**ब.बचावाचे निशाणी क्रमांक–**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | | |

**क.न्यायालयाचे निशाणी–**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | - | |

## ड. मुद्देमाल

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | – | |

## –:: न्यायनिर्णय ::–

(दिनांक १०/०३/२०२६ रोजी पारीत)

अभिलेखावरील उपलब्ध पुरावा आणि गुन्हयाचा तपशील पाहता, खालील मुद्दा माझे विचारार्थ निर्माण झाला. त्या मुद्दयाचे निष्कर्ष मी नोंदविले असून, त्याची कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक ३१/१०/२०२४ रोजी १८.०० वाजण्याच्या दरम्यान मौजे घोडपापडवाडी, येथे जंगलभागात झाडीझुडुपात, ता.सुधागड जि.रायगड येथे आरोपी एका सफेद रंगाच्या पिशवीमध्ये जी.एस.संत्रा गोल्ड देशी दारुच्या प्लॅस्टीकच्या १८० मिलीच्या एकूण १५ बॉटल्या स्वतःच्या फायद्याकरीता विनापरवाना बेकायदेशीररित्या विक्रि करण्याच्या उद्देशाने स्वत:च्या ताब्यात बाळगलेल्या स्थितीत मिळून आला ? | **..नाही..** |
| २. | कोणता आदेश ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.** |

## –::कारणमीमांसा::–

**मुद्दा क्र.०१:–**

०२. प्रस्तुतचा गुन्हा अभियोगपक्षाने मुंबई दारुबंदी कायदा कलम अधिनियम १९४९ चे कलम ६५–ई अन्वये दाखल केला. त्यानुसार अभियोगपक्षाने फिर्यादी सचिन भोईर (अ.सा.२) यांचा पुरावा नोंदविला. त्यांनी त्यांच्या तोंडी पुराव्यादरम्यान नमुद केले की, दि.३१.१०.२०२४ रोजी पोसई निकम यांना गुप्त बातमी प्राप्त झाली. त्या बातमीच्या अनुषंगाने ते, पोसई निकम, म.पो.कडवे हे खाजगी वाहनाने घोडपापड आदिवासीवाडी येथे रवाना झाले. जांभुळपाडा येथे अन्नपुर्णा खानावळ येथे २ पंचांना बोलाविले. त्यानंतर जांभुळपाडा–कळंब रस्त्यावर गेले असता, घोडपापड आदिवासीवाडी येथील रस्त्यापासुन २५ मिटर अंतरावर झाडी झुडुपात एक इसम बसलेला दिसला. त्या इसमास फिर्यादी भोईर यांनी जागीच पकडले. त्या व्यक्तीचे नाव विचारले असता, त्यांने त्यांचे नाव राम किशन साळुंखे असे सांगितले. त्यांच्याकडे दारु विक्रीचा परवाना नसल्याचे निदर्शनास आले व त्या इसमाकडे संत्रा गोल्ड जी.एम. च्या १८० मिलीच्या १५ बाटल्या मिळुन आल्या असे नमुद केले. पोसई निकम यांनी पंचनामा केला व म.पो.शि.कडवे यांनी पंचनामा करातानाचे फोटो काढले असे नमुद केले व आरोपी विरुध्द फिर्याद नोंदविली असे नमुद केले. त्यांनी छाप्या बाबतचे लेखी आदेश प्राप्त झाले नव्हते असे नमुद केले. त्यांनी जप्त केलेल्या बादलीचे उत्पादित केलेली तारीख व बॅच क्रमांक पाहिले नाही असे नमुद केले.

०३. सचिन भोईर (अ.सा.२), प्रेरणा कडवे (अ.सा.४) यांनी त्यांच्या तोंडी पुराव्यादरम्यान पोसई निकम यांना गुप्त बातमी प्राप्त झाली. त्या बातमीच्या अनुषंगाने छापा कारवाई करण्यासाठी पंचनाम्यासाठी आवश्यक साहित्य घेऊन स्टेशन डायरीला नोंद करुन रवाना झालो. जांभुळपाडा कळंब रस्त्यालगत शोध घेतले असता, घोडपापडवाडी गावच्या हद्दीत रस्त्यापासुन २५ मीटर अंतरावर झाडाच्या आडोशाला मळकट रंगाची पिशवी घेऊन बसलेला दिसला. त्या इसमाचा संशय आल्याने भोईर यांनी त्या इसमास जागीच पकडले. त्या इसमाच्या ताब्यातील पिशवीमध्ये १५ देशी संत्रा जी.एम.गोल्ड १८० मिली बाटल्या मिळुन आल्या. त्या व्यकतीने त्याचे नाव राम साळुंखे सांगितले. पंचनामा पासई निकम यांनी तयार केला तर पंचनामा करतानाचे फोटो त्यांच्या त्यांच्या मोबाईलमध्ये काढले असे नमुद केले. सदर गुन्हाचा तपास वरिष्ठांनी त्यांच्या कडे सोपविला. त्यांनी भारतीय पुरावा कायद्यीतील कलम ६३(४) प्रमाणेचे प्रमाणपत्र सिध्द केले. त्यांनी जपत केलेला मुद्देमाल रासायनिक परिणाकामी कलिना येथे पाठविला असे नमुद केले व राष्ट्रीय शाळेकडून प्राप्त झाले सदर अहवाल (निशाणी १६) दाखल केले असे नमुद केले. उलटतपासादरम्यान त्यांनी व–हाड बौध्दवाडा हे पाली खोपोली रस्त्यावर असल्याचे नाकारले व घोडपापड गाव हे जांभुळपाडा व कळंब रस्त्यावर असल्याचे नमुद केले. त्यांनी फोटोग्राफीचे प्रशिक्षण घेतले नसल्याचे नमुद केले.

०४. सचिन निकम (अ.सा.५) यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये त्यांना गुप्त बातमी प्राप्त झाली होती व त्या बातमीच्या अनुषंगाने स्टेशन डायरीला नोंद करुन ते, भोईर,

कडवे यांच्या समवेत खाजगी वाहनाने जांभुळपाडा पासुन २५ कि.मि. अंतरावर रस्त्यापासुन २५ मिटर अंतरावर एक पुरुष मळकळ रंगाची पिशवी घेऊन बसलेला दिसला. त्यास भोईर यांनी धावत जावुन पकडले. त्या पिशवीमध्ये जी.एम.गोल्ड संत्राच्या १५ बाटल्या मिळुन आल्या असे नमुद केले. त्या व्यक्तीने त्यांचे नाव राम किशन साळुंके असे नमुद केले. त्यांनी मुद्देमाल दोन पंचांन समक्ष जप्त केला व जप्त केलेल्या मुद्देमालातील पंच रासायनिक विश्लेषणाकामी काढुन घेतले व उर्वरित मुद्देमाल सिलबंद केला व मुद्देमाल पावती तयार केली (निशाणी १८) असे नमुद केले. त्यांनी बातमी १८.१५ वाजता मिळाली व ते छाप्याकामी १८.३० वाजता निघाले असे नमुद केले व घटनास्थळी जाण्यासाठी १५ मिनिटांचा वेळ लागतो असे नमुद केले. त्यांनी बेवारस मिळून आलेल्या मुद्देमालाच्या आधारे खोटा पंचनामा केल्याचे त्यांनी नाकारले.

०५. मधुकर मानकर (अ.सा.१) यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये दि.३१.१०.२०२४ रोजी निकम यांनी त्यांना पंचनाम्याकरीता बोलाविले होते असे नमुद केले. ते कळंब रोडला जंगलभागात गेले. राम किशन साळुंके याच्याकडील देशी दारु पकडले व पोलीस कर्मचारी कडवे यांनी फोटो काढले. पिशवीमध्ये १५ बादल्या होत्या असे नमुद केले. त्यांच्या उलटतपासादरम्यान जप्त केलेले बाटलीच्या उत्पादन तारीख व बॅच क्रमांक पाहिले नाही असे नमुद केले व ते पोलीस पाटील असल्यामुळे पोलीस जे काम सांगतात ते करावे लागते असे ते सांगितले.

०६. प्रस्तुतचा गुन्हा मुंबई दारुबंदी अधिनियम अंतर्गत असल्याकारणाने जप्त केलेले पदार्थ हे दारु असल्याबाबत अभियोगपक्षाने रासायनिक विश्लेषणाचा अहवाल

नि.क्र.१६ वर दाखल केला. त्या आधारे रासायनिक विश्लेषणाकामी पाठविलेले १८० मि. लिटरचे पदार्थ वस्तु दारु होते असे निदर्शनास येते.

०७. घटनास्थळाचा पंच मधुकर मानकर यांनी त्यांच्या समक्ष कळंब रस्त्याला जंगलभागात गेले असे निदर्शनास आले व त्यांच्या समक्ष पंचनामा झाल्याचे निदर्शनास येते. या बाबीस स्वत: पंचनामा तयार करणारे पोसई निकम (अ.सा.५) तसेच त्यांच्या समवेत असलेले पोलीस कर्मचारी सचिन भोईर (अ.सा.२) व म.पो.शि.कडवे (अ.सा.४) यांनी पुष्टी दिली. त्या आधारे त्यांच्या समक्ष पंचनामा झाल्याची बाब निदर्शनास येते. पोलीसांनी मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे पोलीस कर्मचारी व पंच यांनी घटनास्थळी जावुन त्या व्यक्तीस त्यांच्या समक्ष पकडले असल्याचे निदर्शनास येते. हि बाब विचारात घेतले असता असे निदर्शनास येते की, या बाबीस पोलीस कर्मचारी भोईर (अ.सा.२), म.पो.शि.कडेव (अ.सा.४) व पासई निकम (अ.सा.५) पुष्टी देतात व त्या बाबीस स्वतंत्र साक्षीदार म्हणुन मधुकर मानकर (अ.सा.१) हे पुष्टी देतात या बाबींचा विचार केला असता, राम किशन साळुंके याच्याकडून १५ बाटल्या जप्त केल्याच्या बाबीस पुष्टी मिळते. नामदेव अलदर (अ.सा.३) यांचे पुराव्यातून ते जप्त मुद्देमालातील नमुना रासायनिक प्रयोगशाळे कडे तपासणी साठी घेवन गेले असे नमुद केले.

०८. म.पो.शि. कडवे (अ.सा.४) यांनी पंचनामा चालू असतानाचे फोटो काढले व त्या बाबतचे प्रमाणपत्र नि.१४ त्यांनी दाखल केले. त्यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, निकम यांना व–हाड बौध्दवाडा येथे अवैधरित्या देशीदारुची

विक्री चालु असल्याची बातमी प्राप्त झाली आणि त्यांनी घोडपापड गावच्या हद्दीत रस्त्यापासुन २५ मिटर अंतरावर एक इसम मिळून आला असे नमुद केले.

०९. संपुर्ण पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की गुप्त बातमी मध्ये कळंब रोडवर जंगलभागात घटनेची माहिती मिळाली असे नमुद केले तर सचिन भोईर (अ.सा.२), प्रेरणा कडवे (अ.सा.४) यांनी त्यांचे पुराव्यात घोडपापड गावचे हद्दीत घटनास्थळ असल्याचे नमुद केले. मधुकर मानकर (अ.सा.१) हे पोलीस पाटील असल्याचे निदर्शनास येते. सदरच्या बाबीस प्रत्यक्षदर्शी स्वतंत्र साक्षीदार नाही. सर्व साक्षीदार हे पोलीस कर्मचारी असल्यचे निदर्शनास येते तसेच पंच साक्षीदार देखील पोलीस पाटील असल्या कारणाने पोलीसांसी निगडीत असल्याचे निदर्शनास येते. त्यांचे उलटतपासात जे सांगतील ते काम करावे लागते असे कथन केले. त्यामुळे त्यांचे पुराव्यावर संशय निर्माण होतो. त्याच्यामुळे त्यांनी दिलेला पुराव्याचे स्वत: प्रत्यक्षदर्शी स्वतंत्र साक्षीदाराच्या पुराव्या अभावी अभियोगपक्षाच्या पुराव्यावर संशय निर्माण होते. त्यामुळे, मुद्दा क्र.१ चे उत्तर ''नकारार्थी'' नोंदविण्यात येते.

**<u>मुद्दा क्र.०२ :–</u>**

१०. मुद्दा क्र.०१ चे उत्तर ''नकारार्थी'' नोंदविल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. म्हणून, मी मुद्दा क्र.०२ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे.

:: **आदेश** ::

०१. महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५–ई या शिक्षेस पात्र असणा–या अपराधामधुन या खटल्यातील आरोपी **राम किशन साळुंके,** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

०२. आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

०३. सदर गुन्ह्यात जप्त असलेल्या मुद्देमालाची विल्हेवाट अपिल अथवा अपिल कालावधी संपल्यानंतर मुंबई दारुबंदी जप्त केलेल्या किंवा हक्क काढुन घेतलेल्या वस्तू (विल्हेवाट) नियमन, १९५३ मधील तरतुदीस अधिन राहुन करावी.

०४. आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया कलम ४३७–ए अन्वये अपील कालावधी पर्यंत जामीन १५०००/– रुपयाचा दयावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

SHIVRATRI RAJU ASHOK
Digitally signed by SHIVRATRI RAJU ASHOK
Date: 2026.03.10 15:57:58 +0530

**ठिकाणः पाली.** **(रा.अ.शिवरात्री)**

**दिनाकः १०/०३/२०२६** **न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, पाली**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | Ankush S. Waghmare |
| (b) | Court Name | CJJD & JMFC, Pali |
| (c) | Judgment signed by P.O.on | 10.03.2026 |
| (d) | Judgment uploaded on | 11.03.2026 |